रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२२/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, फेब्रुवारी १५, २००७/माघ २६, शके १९२८

# भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जानेवारी २००४.

### अधिसूचना

क्रमांक एसजीआर. १००२/६८८/प्र.क्र.९२/३१.—महाराष्ट्रास भेटी देणाऱ्या "राज्य अतिथींच्या" आदरातिथ्यात आणि सोयी सुविधात वाढ करण्याबाबत नियमन करणाऱ्या नियमांशी संबंधित असणाऱ्या सर्व विद्यमान शासकीय आदेशांचे अधिक्रमण करून राज्यास भेटी देणाऱ्या 'राज्य अतिथी' च्या संबंधातील सर्व बाबींचे विनियमन करण्यासाठी, महाराष्ट्र शासन पुढील नियम करीत आहे:—

**१. संक्षिप्त नाव व प्रयुक्ति.**— या नियमांना "महाराष्ट्र राज्य अतिथी नियम, २००४" "सुधारित" असे म्हणावे. हे नियम "राज्य अतिथी" म्हणून समजण्यात येणाऱ्या अति अति महत्त्वाच्या/अति महत्त्वाच्या व्यक्तींना उच्च पदाधिकारी व अधिकारी यांना, ते, ज्यावेळेस महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही ठिकाणास भेट देतील, त्यावेळेस लागू होतील.

(एक) या नियमांच्या जोडपत्र 'क' मध्ये नमूद केलेल्या अति अति महत्त्वाच्या/अति महत्त्वाच्या व्यक्तींना ते, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही ठिकाणास जेव्हा भेट देतील तेव्हा त्यांच्या भेटीचे स्वरूप लक्षात न घेता त्यांचे स्वागत, परिवहन, निवास व भोजन व्यवस्था करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यांना "राज्य अतिथी" समजण्यात येईल.

(दोन) या नियमांच्या जोडपत्र 'ख' मध्ये नमूद केलेल्या अति महत्त्वाच्या व्यक्तींना, उच्च पदाधिकारी आणि अधिकारी यांना ते जेव्हा केवळ या राज्य शासनाशी संबंधित कामकाज करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या निमंत्रणावरून भेट देतील तेव्हा त्यांचे स्वागत, परिवहन, निवास व भोजन व्यवस्था करण्याच्या प्रयोजनार्थ त्यांना "राज्य अतिथी" समजण्यात येईल.

राज्य शासनाशी संबंधित असलेल्या शासकीय कामकाजाच्या संबंधात महाराष्ट्रास भेटी देणाऱ्या संसदीय समितीच्या अध्यक्षांच्या बाबतीत त्यांचा निवास, भोजन व परिवहन या व्यवस्थांवरील खर्च राजशिष्टाचार शाखा, सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडून करण्यात येतील. अशी व्यवस्था हॉटेलमध्ये करण्यात आल्यास त्यासाठी होणारा खर्च संबंधित मंत्रालयीन विभागाला सोसावा लागेल. बैठका, परिषदेसाठी अनेक ठिकाणी भेटी, स्वागत, दुपारचे जेवण, रात्रीचे जेवण किंवा पुष्पगुच्छ इत्यादींचे आयोजन करण्यावर जर कोणताही खर्च झाला असेल तर तो खर्च देखील संबंधित मंत्रालयीन विभागाद्वारे सोसण्यात येईल. विशिष्ट समिती/आयोग यांची भेट सरकारी आहे व ती राज्य शासनाच्या कामकाजाशी संबंधित आहे आणि त्यासंदर्भात काढण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे याची खातरजमा करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मंत्रालयीन विभागाची असेल.

(तीन) जोडपत्र 'क' व 'ख' मधील सूचीत समाविष्ट नसलेल्या कोणत्याही अशासकीय व्यक्तींना मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या विनिर्दिष्ट आदेशांनुसार "राज्य अतिथी" म्हणून समजण्यात येईल.

(चार) राज्याला भेटी देणाऱ्या जोडपत्र 'क' व 'ख' मधील सूचीत समाविष्ट नसलेल्या कोणत्याही शासकीय किंवा माजी शासकीय अधिकाऱ्यांना, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या विनिर्दिष्ट आदेशांनुसार 'राज्य अतिथी' समजण्यात येईल.

तथापि, कोणताही पदाधिकारी, समिती, आयोग इत्यादींना राज्य अतिथी समजण्यास इच्छुक असलेला मंत्रालयीन विभाग, मुख्य सचिव/मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे आदेश प्राप्त करण्यापूर्वी अशा भेटीचा महाराष्ट्र राज्याच्या कामकाजाशी निकटचा संबंध आहे आणि ती राज्याच्या हितासाठी आहे, याबाबत खातरजमा करील.

**२. कुटुंबाचे सदस्य/सहकारी सदस्य.**—(एक) पुढील अति अति महत्त्वाच्या व्यक्तींसोबत असणाऱ्या त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना (मग ते त्यांच्यावर अवलंबून असोत अगर नसोत) आणि सहकारी सदस्यांना भोजन व निवासाची व्यवस्था विनाशुल्क पुरविण्यात येईल.

(१) भारताचे राष्ट्रपती,

(२) भाराताचे उपराष्ट्रपती,

(३) भारताचे पंतप्रधान,

(४) भारताचे उपपंतप्रधान,

मात्र महाराष्ट्राला आगाऊ भेट देणाऱ्या सुरक्षा अधिकारी व विशेष सुरक्षा गटाचे कर्मचारी यांच्या भोजनाची व निवासाची व्यवस्था ही पैसे चुकते करून करण्यात येईल.

(दोन) जोडपत्र 'ख' मध्ये नमूद करण्यात आलेल्या "राज्य अतिथी" सोबत (जास्तीत जास्त तीन एवढ्या संस्थेच्या अधीन) येणाऱ्या त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना "राज्य अतिथी" समजण्यात येईल.

(तीन) जोडपत्र 'ख' मध्ये नमूद करण्यात आलेल्या "राज्य अतिथी" सोबत (जास्तीत जास्त दोन एवढ्या संख्येच्या अधीन) त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना "राज्य अतिथी" समजण्यात येईल.

**टीप.**— "राज्य अतिथीच्या" कुटुंबातील सदस्यांमध्ये पती/पत्नी व त्यांच्यावर अवलंबून असणारी मुले, अविवाहित मुली व आई वडील यांचा समावेश आहे.

३. **स्वीय कर्मचारी वर्ग.**—(एक) इतर राज्यांच्या राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्या बरोबर असणाऱ्या स्वीय कर्मचारी वर्गापैकी जास्तीत जास्त ५ कर्मचाऱ्यांची निवासाची व भोजनाची व्यवस्था ते कर्मचारी राज्यपाल/मुख्यमंत्री यांच्यासोबत रहात असतानाच्या कालावधीत विनाशुल्क करण्यात येईल. राज्यांच्या राज्यपालांची निवास व्यवस्था मुंबईतील सह्याद्री राज्य अतिथीगृहात करण्यात आली असेल तर राज्यपालांच्या परिसहायकाची निवास व्यवस्था देखील सह्याद्री राज्य अतिथीगृहात करण्यात येईल. राज्यपालांबरोबर असणाऱ्या इतर अधिकारी व कर्मचारीवर्गाची निवासव्यवस्था मुंबईतील अन्य राज्य अतिथीगृहांमध्ये करण्यात येईल.

(दोन) जोडपत्र 'ग' मध्ये नमूद करण्यात आलेल्या 'राज्य अतिथी' बरोबर असणाऱ्या स्वीय कर्मचारीवर्गापैकी केवळ एका सदस्याला, तो राज्य अतिथींच्या सोबत रहात असतानाच्या कालावधीत निवासाची व भोजनाची व्यवस्था राज्य अतिथीगृहात विनाशुल्क पुरविण्यात येईल.

(तीन) जोडपत्र 'ख' मध्ये नमूद करण्यात आलेल्या "राज्य अतिथी" बरोबर असणाऱ्या कोणत्याही स्वीय कर्मचारीवर्गाची निवासाची व भोजनाची व्यवस्था उपलब्धतेनुसार पैसे चुकते करून राज्य अतिथीगृहात करण्यात येईल.

४. **राज्य अतिथीविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याचा कालावधी.**—(एक) पुढील अति महत्त्वाच्या व्यक्ती व त्यांच्या सहकारी सदस्य यांना, राज्यातील त्यांच्या संपूर्ण वास्तव्याच्या कालावधीत "राज्य अतिथी" सुविधा पुरविण्यात येतील.

(क) भारताचे राष्ट्रपती,

(ख) भारताचे उप राष्ट्रपती,

(ग) भारताचे पंतप्रधान,

(घ) भारताचे उप पंतप्रधान,

(दोन) इतर 'राज्य अतिथींना' राज्य अतिथी सुविधा पुरविण्यासाठीचा कालावधी हा जोडपत्र 'क' मध्ये नमूद केलेल्या उच्च पदाधिकाऱ्यांसाठी प्रत्येक वेळी पाच दिवस आणि जोडपत्र 'ख' मध्ये नमूद केलेल्या उच्च पदाधिकाऱ्यांसाठी प्रत्येक वेळी तीन दिवस यापेक्षा अधिक असणार नाही. हा कालावधी महाराष्ट्रात आगमन झाल्याच्या पहिल्या दिवसापासून मोजण्यात येईल.

५. **स्वागत.**—महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही ठिकाणाला (एक) भारताचे राष्ट्रपती, (दोन) भारताचे उपराष्ट्रपती, (तीन) भारताचे पंतप्रधान भेटी देत असताना त्यांचा स्वागत समारंभ व निरोप समारंभ, भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या पत्र क्र. १३/३७/७९-राज्ये, दिनांक ८ जुलै १९८० (विषय: राज्ये व संघराज्य क्षेत्रांना भेटी देणाऱ्या पदाधिकाऱ्यांचे करावयाचे आतिथ्य) यात घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आयोजित करण्यात येईल.

**इतर "राज्य अतिथी" च्या महाराष्ट्रातील भेटी.—**

**मुंबईत.**—विशेष अधिकारी (राजशिष्टाचार), राजशिष्टाचार शाखा, सामान्य प्रशासन विभाग हे, "राज्य अतिथींचे" विमानतळांवर त्यांच्या आगमनाच्या वेळी स्वागत करतील आणि त्यांच्या प्रस्थानाच्या वेळी त्यांना निरोप देतील.

**जिल्ह्यांत.**—संबंधित जिल्ह्याचा जिल्हाधिकारी 'राज्य अतिथींचे' स्वागत करण्यासाठी व त्यांना निरोप देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करील.

मंत्रालयीन विभागाद्वारे "राज्य अतिथी" म्हणून समजण्यात येणाऱ्या उच्च पदाधिकारी व अधिकारी यांच्या बाबतीत संबंधित विभागाचा अधिकारी देखील अशा राज्य अतिथींचे स्वागतही करील व त्यांना निरोप देईल.

मुंबईत, रेल्वेने प्रवास करणाऱ्या 'राज्य अतिथींचे' स्वागत व त्यांना निरोप देण्याचे काम संबंधित रेल्वे स्थानकाचा शहर रेल्वे पोलीस अधिकारी करील.

**६. वाहतूक व्यवस्था.**—(एक) राज्य अतिथींसाठी मोफत वाहतूक व्यवस्थेची सोय करण्यात येईल.

(दोन) साधारणतः बृहन्मुंबईच्या किंवा यथास्थिती, जिल्ह्याच्या हद्दीमधील प्रवासांसाठी "राज्य अतिथीला" वाहतूक व्यवस्था पुरविण्यात येईल.:

परंतु, विवक्षित आकस्मिक प्रसंग उद्‌भवल्यास, राज्य अतिथीला त्यांने मुंबईस भेट दिली असेल तर, सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) यांची किंवा जिल्ह्याला भेट दिली असेल तर संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची औपचारिक परवानगी घेऊन मुंबई शहराच्या/जिल्ह्याच्या हद्दी बाहेर राज्यांतर्गत वाहन नेता येईल.

(तीन) साधारणत : पुढील उच्च पदाधिकारी वगळता, इतर प्रत्येक उच्च पदाधिकाऱ्यास त्यांच्या भेटी दरम्यान एक वाहन उपलब्ध करून देण्यात येईल.

| | |
|---|---|
| (एक) भारताचे राष्ट्रपती<br>(दोन) भारताचे उपराष्ट्रपती<br>(तीन) भारताचे पंतप्रधान<br>(चार) भारताचे उपपंतप्रधान | आवश्यकतेप्रमाणे मोटार गाड्या पुरविण्यात येतील. |
| (पाच) अन्य राजाचे राज्यपाल<br>(सहा) अन्य राजाचे मुख्यमंत्री | दोन मोटार गाड्या |

संसदीय समितीच्या आणि निरनिराळ्या आयोगाच्या भेटींच्या वेळी समीतीच्या वा आयोगाच्या अध्यक्षपदस्थ व्यक्तीला, स्वतंत्र मोटार गाडी देण्यात येईल. तथापि, इतर सदस्यांना पुरवावयाच्या मोटारगाड्यांची संख्या किमान ठेवण्यात यावी. सोयीचे ठरत असेल तेथे मिनी बसेसचा वापर करण्यात यावा.

(चार) जेथे पैसे चुकते करून वाहतूक व्यवस्था करण्यात येते तेथे उक्त पैसे पक्षातील व्यक्ती भेटीचे ठिकाण सोडून जाण्यापूर्वी त्यांच्याकडून वसूल करण्यात येतील.

(पाच) शासकीय वाहन उपलब्ध नसल्यास भाड्याचे वाहन 'राज्य अतिथींना' पुरविण्यात येईल. मुंबईत, नियंत्रक शासकीय परिवहन सेवा, आणि जिल्ह्यात राज्य शासनाचे संबंधित अधिकारी हे अशा रीतीने उपलब्ध करून देण्यात आलेले भाड्याचे वाहन यांत्रिकदृष्ट्या चांगल्या अवस्थेत असल्याची आणि त्याचा वाहनचालक सुरक्षेच्या दृष्टीने योग्य असल्याची खातरजमा करतील.

**७. भोजन व्यवस्था.**---'राज्य अतिथींसाठी' ते "राज्य अतिथी" म्हणून हक्कदार असतील अशा कालावधीकरिता मोफत भोजनव्यवस्था करण्यात येईल. तेथे राहणाऱ्यांना प्रमाणभूत खाद्यपदार्थांच्या यादीतील खाद्यपदार्थ पुरविण्यात येतील.

**८. निवास व्यवस्था.**---(एक) राज्य अतिथींची मुंबईतील निवास व्यवस्था एखाद्या राज्य अतिथीगृहात करण्यात येईल आणि जिल्ह्याच्या ठिकाणी ती सर्कीट हाऊसमध्ये करण्यात येईल. विशिष्ट उच्च पदाधिकाऱ्यांसाठी व्यवस्था महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या मान्यतेच्या अधीन, मुंबई, पुणे व नागपूर येथील राजभवनामध्ये करण्यात येईल. सह्याद्री राज्य अतिथीगृहात ज्या उच्च पदाधिकाऱ्यांची निवास व्यवस्था करण्यात येईल त्यांची यादी जोडपत्र 'घ' मध्ये दर्शविण्यात आली आहे. ही निवासव्यवस्था देखील सह्याद्री राज्य अतिथीगृहातील योग्य कक्षांच्या उपलब्धतेच्या अधीन असेल. राज्य अतिथींचा ती राज्य अतिथी म्हणून हक्कदार असेल अशा कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी राहण्याची इच्छा असेल त्याबाबतीत कक्ष उपलब्ध असण्याच्या अधीन आणि सामान्य प्रशासन विभागाच्या पूर्व मान्यतेने, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विहित दरांनुसार, प्रत्यक्ष रक्कम प्रदान करण्याच्या तत्त्वावर कक्ष उपलब्ध करून देण्यात येतील.

(दोन) विशेष परिस्थितीत मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेच्या अधीन, "राज्य अतिथींची" निवास व्यवस्था चांगल्या हॉटेलमध्ये करण्यात येईल.

**९. अन्य व्यवस्था.**---(एक) जोडपत्र 'क' व 'ख' मध्ये सूचीबद्ध करण्यात आलेल्या अति महत्त्वाच्या व्यक्ती/उच्च पदाधिकारी यांचे स्वागत, निरोप समारंभ, त्यांच्यासाठीची वाहन व्यवस्था, निवास व्यवस्था व सुरक्षा या संबंधातील व्यवस्था ही सामान्य प्रशासन विभागाच्या राजशिष्टाचार शाखेद्वारे करण्यात येईल.

(दोन) नियम (तीन) व १ (चार) अन्वये ज्या राज्य अतिथी म्हणून समजण्यात येणाऱ्या उच्च पदाधिकाऱ्यांची/अधिकाऱ्यांची व्यवस्था ही, सामान्य प्रशासन विभागाच्या राजशिष्टाचार शाखेच्या सहाय्याने भेटी पुरस्कृत करणाऱ्या मध्यवर्ती (नोडल) विभागाद्वारे/कार्यालयाद्वारे करण्यात येईल. अशा भेटीच्या व्यवस्थेवरील खर्च वरील संबंधित विभागाद्वारे कार्यालयाद्वारे करण्यात येईल. अशा 'राज्य अतिथींची' राज्य अतिथीगृहात निवासव्यवस्था करण्याकरिता आणि शासकीय परिवहन सेवा यांच्याकडून वाहन उपलब्ध करून देण्याकरिता राजशिष्टाचार शाखा सर्वतोपरी प्रयत्न करील. तथापि, कक्ष किंवा वाहने उपलब्ध झाली नाहीत तर संबंधित विभागाला आवश्यक ती व्यवस्था स्वतंत्रपणे करावी लागेल.

**१०. इतर भेटी.**---(एक) जे अन्यथा राज्य अतिथी नाहीत मात्र ज्यांना राज्य अतिथी समजण्यात येत आहे. अशा अति महत्त्वाच्या व्यक्ती/उच्च पदाधिकारी वगळता, अशासकीय मान्यवर, उच्च पदावरील अधिकारी इत्यादींची, निवासव्यवस्थेच्या उलब्धेतच्या अधीन, त्या त्या वेळी विहित करण्यात आलेल्या दराने थेट रकमेचे प्रदान करून राज्य अतिथीगृहातदेखील निवासव्यवस्था करण्यात येईल.

(दोन) अशासकीय सदस्यांची राज्य अतिथीगृहात निवासव्यवस्था करावयाची असते त्यावेळी मुख्यमंत्री, राजशिष्टाचार मंत्री यांचा आदेश मिळविण्यात येईल.

(तीन) भारत सरकारच्या विविध मंत्रालयाचे आणि मुंबईतील विदेशी वाणिज्यदूतावासाचे अतिथी यांसारखे विदेशी उच्च पदाधिकारी यांचीदेखील त्यांनी केलेल्या विनंतीवरून प्रत्यक्ष रक्कम प्रदान करण्याच्या अधीनतेने सह्याद्री राज्य अतिथीगृहात निवासव्यवस्था करता येईल.

**११. निवासव्यवस्थेचे आरक्षण.**––(एक) राज्य अतिथीगृहांत राज्य अतिथींची निवासव्यवस्था करणे हा मूळ उद्देश आहे. तथापि, राज्य अतिथीगृह, मुंबई यातील निवासव्यवस्था, ती उपलब्ध असण्याच्या अधीन ज्या दिवसापासून निवासाची व्यवस्था करणे आवश्यक आहे त्या दिवसापासून सर्वसाधारणतः सात दिवस अगोदर सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार), मंत्रालय यांच्याकडे लेखी मागणी करून इतर अतिथींसाठी आरक्षित करता येईल. हे आरक्षण पक्के झाल्याची पुष्टी ताबा घेण्याच्या दिनांकापूर्वी केवळ २४ तास अगोदर देण्यात येईल. सह्याद्री, हायमाऊंट व नंदगिरी राज्य अतिथीगृहातील विविध दालनाचे/कक्षाचे भाडे हे शासनाने विहित केलेल्या दराने पैसे भरून राहणाऱ्या अतिथींकडून आगाऊ रोख रकमेने वसूल करण्यात येईल.

(दोन) राज्य अतिथीगृहातील निवासव्यवस्थेचे आरक्षण हे, सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार यांच्या विनिर्दिष्ट निदेशांद्वारे करण्यात येईल. राज्य अतिथीगृहाच्या व्यवस्थापकास, त्याच्याशी थेट संपर्क साधून केलेल्या मागणीच्या आवश्यकतेच्या आधारे (राज्य अतिथीगृहातील) दालने/कक्ष आगाऊ राखून ठेवण्याचा कोणताही अधिकार असणार नाही.

(तीन) कक्षांचे प्रत्यक्ष वाटप राज्य अतिथीगृहाच्या व्यवस्थापकाद्वारे करण्यात येईल.

(चार) राज्य अतिथीगृहातील निवासव्यवस्थेचे आरक्षण हे, सर्व साधारणपणे, आरक्षण करण्यात आल्याच्या दिवशी ६ तासांच्या आत जर कक्ष/दालन यांचा ताबा घेतला नाही, तर रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

(पाच) आरक्षण रद्द झाल्याबाबतची माहिती, योग्यवेळी राज्य अतिथीगृहाच्या व्यवस्थापकास किंवा सामान्य प्रशासन विभागास (राजशिष्टाचार) कळविण्यात यावी.

(सहा) कोणतीही पूर्व सूचना न देता रक्कम भरून करण्यात आलेले कोणतेही आरक्षण ते राज्य अतिथींसाठी आवश्यक असल्यास रद्द करण्याचे अधिकार सामान्य प्रशासन विभागाने (राजशिष्टाचार) आपल्याकडे राखून ठेवले आहेत.

**१२. निवास ताब्यात देण्या-घेण्याबाबतची नोंदवही.**––(एक) व्यवस्थापक, राज्य अतिथीगृह निवासास येणाऱ्या राज्य अतिथी व इतर पदाधिकारी यांचे आगमन/प्रस्थान व अशा प्रकारचा अन्य तपशील नोंदवून ठेवण्याकरिता निवास ताब्यात देण्या-घेण्याबाबतची नोंदवही ठेवील.

(दोन) ज्यांना रक्कम प्रदान करण्याच्या भाडे तत्त्वावर निवासव्यवस्था पुरवण्यात आली आहे. अशा राज्य अतिथी किंवा अन्य यांच्याबरोबर असणाऱ्या स्वीय कर्मचारी वर्ग किंवा राज्य अतिथी स्वतः त्या प्रयोजनार्थ ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत तपशील भरेल.

**१३. तक्रार व सूचना पुस्तक.**—राज्य अतिथीगृहाच्या व्यवस्थापकांकडून तक्रार-नि-सूचना पुस्तक ठेवण्यात येईल.

**१४. निवासव्यवस्थेसाठीचे भाडे.**—(एक) जेव्हा निवासव्यवस्था भाडेतत्वावर पुरविण्यात येते त्यावेळी आगमन झाल्यापासून मोजण्यात आलेले प्रत्येक २४ तासांचे भाडे हे राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या दराने रोखीने आगाऊ वसूल करण्यात येईल.

(दोन) सर्वसाधारणपणे एका दालनात दोन व्यक्तींहून अधिक व्यक्तींना राहण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

(तीन) एकाच संमेलनाला बैठक इत्यादीसाठी गटाने एकत्र येणाऱ्या व्यक्तींना दालनात एकत्र राहण्याची परवानगी देण्यात येईल आणि या प्रकरणात प्रत्येकांकडून दोन दालनांसाठी विहित करण्यात आलेल्या भाड्याच्या ५० टक्के इतकी रक्कम आकारण्यात येईल :

परंतु एखाद्या अतिथीला अतिरिक्त स्वतंत्र कक्ष देण्यात आल्यास, अशा ताबा घेणाऱ्या व्यक्तींकडून त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विहित दरानुसार अतिरिक्त कक्षाचे भाडे आकारण्यात येईल.

**१५. भोजन व्यवस्था.**—(एक) राज अतिथीगृहामध्ये उपलब्ध असलेल्या खाद्यपदार्थांच्या सूचीप्रमाणे राज्य अतिथीगृहात शाकाहारी व मांसाहारी भोजन पुरविण्यात येईल.

(दोन) अतिथींनी, सकाळच्या/रात्रीच्या भोजनाविषयी आपल्या पसंतीच्या पदार्थांची सूचना व्यवस्थापनाला पुरेशी अगोदर देणे आवश्यक आहे.

(तीन) अल्कोहोलयुक्त मद्य (दारू), सिगारेट, पान, तंबाखू यांच्या सेवनास राज्य अतिथीगृहात परवानगी असणार नाही.

**१६. खाद्यपदार्थांच्या वेळा.**—राज्य अतिथीगृहात सर्व साधारणपणे चहा/अल्पोपहार/जेवण इत्यादी खालील वेळांमध्ये पुरवण्यात येईल:—

| | |
|---|---|
| बेड टी | सकाळी ६.०० ते ७ वाजेपर्यंत |
| अल्पोपहार | सकाळी ८.०० ते ९-३० वाजेपर्यंत |
| दुपारचे जेवण | दुपारी १२-०० ते २-०० वाजेपर्यंत |
| चहा | सायंकाळी ०४-०० ते ०६-०० वाजेपर्यंत |
| रात्रीचे जेवण | रात्री ०८-०० ते १०-०० वाजेपर्यंत. |

परंतु, व्यवस्थापकास राज्य अतिथींना सोईस्कर असेल त्याप्रमाणे या वेळांमध्ये बदल करता येतील.

**१७. कक्षामध्ये पुरवावयाच्या सेवा.**—(एक) सर्वसाधारणपणे, अल्पोपहार, सकाळचे जेवण व रात्रीचे जेवण सामायिक डायनिंग हॉलमध्ये देण्यात येईल. तथापि, राज्य अतिथींनी केलेल्या विनंतीवरून कक्षात खाद्यपदार्थ पुरविण्याची सेवादेखील उपलब्ध करून देण्यात येईल.

**१८. स्वीय अतिथींचे आतिथ्य करणे.**—(एक) राज्य अतिथींला, त्यांच्या स्वीय अतिथींचे राज्य अतिथीगृहांमध्ये अल्पोपहार, सकाळचे जेवण किंवा रात्रीचे जेवण देऊन आदरातिथ्य करावयाची इच्छा असल्यास तशी व्यवस्था करण्यात येईल. मात्र त्याबाबतची पुरेशी आगाऊ सूचना राज्य अतिथीगृहाच्या व्यवस्थापकाला देण्यात आली पाहिजे. तथापि, राज्य अतिथीला अशा व्यवस्थेचा खर्च सोसावा लागेल.

(दोन) शासकीय राज्य अतिथीगृहांच्या दालनांमध्ये कक्षामध्ये राहणाऱ्या राज्य अतिथींना व इतर व्यक्तींना, त्यांच्या स्वतःच्या कौटुंबिक सदस्यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस आपल्या कक्षामध्ये ठेवून घेता येणार नाही.

१९. **दूरध्वनी/एसटीडी/ट्रन्क कॉल्स/आयएसडी सुविधा.**—(एक) पुढील राज्य अतिथींना, आंतरराष्ट्रीय दूरध्वनी सेवेसह (आयएसडी) संपूर्ण दूरध्वनी व्यवस्था मोफत उपलब्ध करून देण्यात येईल.—

(क) भारताचे राष्ट्रपती

(ख) भारताचे उप राष्ट्रपती

(ग) भारताचे पंतप्रधान

(घ) भारताचे उप पंतप्रधान

(दोन) जोडपत्र 'ड' मध्ये नमूद केलेल्या राज्य अतिथींना, केवळ कार्यालयीन काम करण्यासाठी मोफत एसटीडी आणि ट्रन्क कॉल्स यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

(तीन) सर्व राज्य अतिथींना स्थानिक दूरध्वनी सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात येईल.

(चार) इतर अतिथींना पैसे भरून एसटीडी/आयएसडी/ट्रन्ककॉल्स यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

(पाच) ट्रन्क कॉल्स आणि एसटीडी कॉल्स (दूरध्वनी) हे कर्तव्य बजावणाऱ्या, दूरध्वनी चालकामार्फत नोंदवून घेण्यात येतील आणि हा दूरध्वनीचालक या प्रयोजनार्थ ही सर्व ट्रंक कॉल्स/एसटीडी/आयएसडी यांची ठेवण्यात आलेल्या स्वतंत्र नोंदवहीत नोंद घेईल.

२०. **कपडे धुलाई वरील (लॉन्ड्री) खर्च.**—जोडपत्र 'च' मध्ये सूचीबद्ध केलेल्या राज्य अतिथींच्या बाबतीत त्यांच्या कपडे धुलाई (लॉन्ड्री) वरील खर्च राज्य शासनाद्वारे करण्यात येईल.

२१. **वृत्तपत्रे, नियतकालिके पुरवणे.**—(एक) जोडपत्र 'च' मध्ये सूचीबद्ध केलेल्या राज्य अतिथींच्या दालनामध्ये/कक्षांमध्ये राज्य शासनाच्या खात्यातून दैनिक वृत्तपत्रे/नियतकालिके पुरविण्यात येतील.

(दोन) राज्य अतिथीगृहाच्या व्यवस्थापक, आराम कक्षात ठेवावयासाठी दैनिक वृत्तपत्रे व नियतकालिके यांच्या काही प्रती खरेदी करील.

२२. **सुरक्षा.**—गृह मंत्रालय, भारत सरकार व राज्य शासन यांनी याविषयी, वेळोवेळी जारी केलेल्या निदेशांनुसार पोलीस महासंचालक/पोलीस आयुक्त यांच्याकडून राज्य अतिथींना सुरक्षा व्यवस्था पुरवण्यात येईल.

२३. **शिथिल करणे.**—राज्य शासनास प्रत्येक प्रकरणात विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट राज्य अतिथी व पक्ष आणि त्यांच्या महाराष्ट्रातील वास्तव्याचा कालावधी यांच्याशी संबंधित असलेल्या नियमांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदी शिथिल करता येतील.

## जोडपत्र 'क'

## (राज्य अतिथी) नियम १ पहा

भारताचे राष्ट्रपती,
भारताचे उप राष्ट्रपती,
भारताचे पंतप्रधान,
भारताचे उप पंतप्रधान,
मुख्य न्यायाधीश आणि न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय,
लोकसभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष/उप सभापती,
केंद्रीय मंत्री/केंद्रीय राज्यमंत्री/उपमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशाचे संसदीय सचिव,
इतर राज्याचे राज्यपाल/केंद्रशासित प्रदेशाचे लेफ्टनंट गव्हर्नर,
इतर राज्याचे/केंद्रशासित प्रदेशाचे मुख्य मंत्री,
उपाध्यक्ष, सदस्य नियोजन आयोग,
राज्यसभेचे विरोधी पक्षनेता,
लोकसभेचे विरोधी पक्षनेता,
भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती/उप राष्ट्रपती,
भूतपूर्व पंतप्रधान,
भूतपूर्व अध्यक्ष, लोकसभा,
महाराष्ट्र शासनाचे भूतपूर्व राज्यपाल,
इतर राज्याचे उप मुख्यमंत्री,
इतर राज्याचे उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश,
इतर राज्याचे विधानसभेचे अध्यक्ष,
इतर राज्याचे/केंद्रशासित प्रदेशाचे विधानपरिषदेचे सभापती,
संघ लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष, सदस्य,
मंत्री मंडळाचे सचिव,
केंद्र शासनाचे सचिव,
इतर राज्याचे/केंद्रशासित प्रदेशाचे मुख्य सचिव व प्रशासक,
भारत शासनाचे ॲटर्नी जनरल,
भारत शासनाचे नियंत्रक व महालेखापरीक्षक,
केंद्र शासनाचे मुख्य निवडणूक आयुक्त व निवडणूक आयुक्त,
स्वतंत्ररीत्या येणारे राष्ट्रपतीचे सचिव,
स्वतंत्ररीत्या येणारे उप राष्ट्रपतींचे सचिव,
स्वतंत्ररीत्या येणारे पंतप्रधानांचे सचिव,
सचिव, राज्यसभा/सचिव, जनरल लोकसभा,
सॉलिसिटर जनरल व अतिरिक्त सॉलिसिटर जनरल,

## जोडपत्र 'ख'

## कार्यालनीय कामानिमित्त येणाऱ्या मान्यवरांना "राज्य अतिथी" समजणे

## नियम (१) (दोन) पहा

इतर राज्याचे केंद्रशासित प्रदेशाचे मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री,

इतर राज्याचे केंद्रशासित प्रदेशाचे विधानसभा, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेता,

राज्याच्या विधानसभेचे उपाध्यक्ष,

राज्याच्या विधानपरिषदेचे उप सभापती,

राज्य शासनाच्या कामानिमित्त महाराष्ट्र राज्याला भेटी देणारे संसदीय समितीचे अध्यक्ष,

## जोडपत्र 'ग'

## सोबत येणारा कर्मचारीवर्ग

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती व न्यायमूर्ती,

सभापती व उप सभापती, लोकसभा,

उपाध्यक्ष, राज्यसभा,

केंद्रीय मंत्री व राज्यमंत्री,

नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष,

राज्यसभा व लोकसभेचे विरोधी पक्षनेता,

इतर उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश,

इतर राज्याच्या विधान परिषदेचे सभापती,

इतर राज्याच्या विधान सभेचे अध्यक्ष.

# जोडपत्र 'घ'

## सह्याद्री राज्य अतिथीगृह

भारताचे राष्ट्रपती,
भारताचे उप राष्ट्रपती,
भारताचे पंतप्रधान,
इतर राज्याचे राज्यपाल/केंद्रशासित प्रदेशाचे लेफ्टनंट गव्हर्नर,
भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती/उप राष्ट्रपती,
भारताचे भूतपूर्व पंतप्रधान,
मुख्य न्यायाधीश आणि न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय,
लोकसभेचे अध्यक्ष
केंद्रीय मंत्री/केंद्रीय राज्यमंत्री
उपाध्यक्ष, नियोजन आयोग,
लोकसभा व राज्यसभेचे विरोधी पक्षनेता,
इतर राज्याचे मुख्यमंत्री,
महाराष्ट्र शासनाचे भूतपूर्व राज्यपाल,
भूतपूर्व अध्यक्ष, लोकसभा,
राज्यसभेचे उप सभापती,
लोकसभेचे उपाध्यक्ष,
इतर राज्याचे उप मुख्यमंत्री,
सदस्य, नियोजन आयोग,
मंत्रिमंडळ सचिव,
संघ लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष, सदस्य,
केंद्र शासनाचे मुख्य निवडणूक आयुक्त व निवडणूक आयुक्त,
भारत शासनाचे नियंत्रक व महालेखापरीक्षक,
इतर राज्याचे उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश,
इतर राज्याचे विधानसभेचे अध्यक्ष,
इतर राज्याचे विधानपरिषदेचे सभापती,
इतर राज्याचे कॅबिनेट मंत्री,
सचिव, भारत शासन,
परदेशस्थ शिष्टमंडळाचे मान्यवर व सदस्य,
लोकसभेचे भूतपूर्व अध्यक्ष,

(शा.म.मु.) एच १६६१—३ (५--९-१२)

## जोडपत्र 'ङ'

## ट्रन्क कॉल्स व एसटीडी सुविधा

भारताचे उप प्रंतप्रधान
मुख्य न्यायाधीश आणि न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय,
लोकसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष,
राज्यसभेचे उप सभापती,
केंद्रीय मंत्री/केंद्रीय राज्यमंत्री,
इतर राज्याचे राज्यपाल,
इतर राज्याचे मुख्य मंत्री,
उपाध्यक्ष, नियोजन आयोग,
लोकसभा व राज्यसभेचे विरोधी पक्षनेता,
भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती/उप राष्ट्रपती,
भारताचे भूतपूर्व पंतप्रधान,
इतर राज्याचे उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश,
इतर राज्याचे विधानसभेचे अध्यक्ष,
इतर राज्याचे विधानपरिषदेचे सभापती,
भारताचे अटर्नी जनरल,
मंत्रिमंडळ सचिव,
भारत सरकार नियंत्रक व महालेखापरीक्षक,
केंद्र शासनाचे मुख्य निवडणूक आयुक्त व निवडणूक आयुक्त,
भूतपूर्व अध्यक्ष, लोकसभा,

## जोडपत्र 'च'

## (कपडे धुलाई) लॉन्ड्री सुविधा

भारताचे उप प्रंतप्रधान,
भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती/उप राष्ट्रपती,
लोकसभेचे अध्यक्ष,
मुख्य न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय,
इतर राज्याचे राज्यपाल,
महाराष्ट्राचे भूतपूर्व राज्यपाल.

## जोडपत्र 'छ'

## (वृत्तपत्र)

उप पंतप्रधान,
भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती व उप राष्ट्रपती,
लोकसभेचे अध्यक्ष,
सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती,
इतर राज्याचे राज्यपाल,
महाराष्ट्र शासनाचे भूतपूर्व राज्यपाल,
केंद्रीय मंत्रिमंडळाचे मंत्री,
राज्यसभा व लोकसभेचे विरोधी पक्षनेता,
नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, इतर राज्याचे, मुख्यमंत्री,
भूतपूर्व पंतप्रधान,
सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. म. निंबाळकर,**
शासनाचे मुख्य सचिव.